CLUB E- BULLETIN -ROTARY CLUB OF BADLAPUR INDUSTRIAL AREA

MONTHLY ISSUE - November 25 Dist.: 3142 • Club Id: 53964





# NIRMAN

**The best way to find yourself is to lose yourself in the service of others....**

| RTN. AMIT PADHYE<br>CLUB PRESIDENT<br>2025-2026 | RTN. SANTOSH BANE<br>CLUB SECRETARY<br>2025-2026 | RTN. SATISH SALVANKAR<br>BULLETIN EDITOR<br>2025-2026 |
|---|---|---|

# Smart Year 2019 - 20



**-By SMART President**
**Rtn. Yogendra Jawadekar**

मला ‘रोटरी क्लब ऑफ बदलापूर इंडस्ट्रियल एरिया’चा अध्यक्ष होण्याची संधी मिळाली. त्याआधी जरी मी १५ वर्षं क्लबचा सदस्य होतो आणि सविता तीन वर्षांपूर्वी अध्यक्ष होऊन गेल्यामुळे अध्यक्षपदाची जबाबदारी काय असते हे जवळून पाहिलं होतं, तरीही हा अनुभव माझ्यासाठी नवा, वेगवेगळ्या आव्हानांनी भरलेला आणि खूप काही शिकवून जाणारा होता. आनंददायी होताच, पण माझ्या क्लबसाठी आणि समाजासाठी माझ्या परीनं काही अंशी उपयोगी पडू शकल्याचं समाधान देणाराही होता.

वर्षभरात अनेक उपक्रम, कार्यक्रम आणि प्रकल्प केले. त्यांची महिनावार जंत्री मी पुढे दिली आहेच. त्यामुळे त्या तपशीलात न जाता, नवीन अनुभव काय मिळाले, त्याबद्दल थोडक्यात लिहितो आहे.

प्री-पेट्सच्या वेळी नाटक लिहिणं, बसवणं, त्यात काम करणं — ही बाब माझ्या आवडीची. त्यात आमच्या नाटकाला तिसरं बक्षीसही मिळालं, त्यामुळे आनंद द्विगुणित झाला.

जिल्हास्तरावरील ‘ग्रँट्स आणि मेंबरशिप सेमिनार’चं यजमानपद आपण मागून घेतलं आणि यशस्वीपणे कार्यक्रम केला. खरं तर जिल्हास्तरावरील कार्यक्रमाचं यजमानपद हा खर्चाचा आणि आतबट्ट्याचा व्यवहार असतो. पण आपण हा कार्यक्रम अपेक्षेपेक्षा अधिक यशस्वी केला — पैसे घालवले नाहीत, उलट मिळवले, आणि ते नियमाप्रमाणे रोटरी जिल्हा प्रशासनाला दिले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मला क्लबच्या प्रत्येक सदस्याकडून मदत झाली. पुढे, जुलै महिन्यात पुराच्या पाण्यात महालक्ष्मी एक्सप्रेस अडकून पडली होती, तेव्हा आपल्या क्लबनं केलेल्या मदतकार्यात क्लबच्या एकीचा आणि प्रत्येक सदस्याच्या अंगी असलेल्या सेवावृत्तीचा अनुभव प्रकर्षानं आला – आणि पुढेही वारंवार येत राहिला. मग मंगळागौर, दिवाळी, फॅमिली नाईट अशी उत्सवी कार्यं असोत की पूरग्रस्तांना मदत पाठवणं (एक ट्रकभर सामान आणि शिधा सांगली जिल्ह्यात स्वतः नेऊन दिला गेला!), पूरग्रस्त शाळांमध्ये आणि आदिवासी भागातील शाळांमधील वैद्यकीय शिबिरं असोत, किंवा निधी संकलनासाठी केलेला 'मैफल चौरंगी' हा कार्यक्रम असो – सगळीकडे आपला सहभाग लक्षणीय होता.

जिल्हा अनुदानातून शाळेत स्वच्छतागृह बांधणं, शैक्षणिक सॉफ्टवेअर व हार्डवेअर (ई-लर्निंग किट) तीन शाळांमध्ये देणं – असे नेहमीचे प्रकल्प आपण केलेच. इतरही बरेच उपक्रम राबवले गेले.

प्रथेनुसार आपल्या क्लबच्या सदस्यांनी डिस्कॉनला उत्साहानं हजेरी लावलीच, पण कलकत्त्यात झालेल्या शतकपूर्ती सोहळ्यातही सहभाग नोंदवला!

आनंदवन आणि हेमलकसा – या आमटे कुटुंबीयांनी निर्माण केलेल्या आधुनिक तीर्थक्षेत्रांना आम्ही यात्रा केली आणि 'फूल ना फुलाची पाकळी' म्हणून त्यांच्या कार्याला आर्थिक हातभारही लावला.

मार्च २०२० च्या अखेरीस कोविडच्या साथीमुळे सगळं जग संकटात असताना आपल्या क्लबनं जो धीरोदात्तपणा दाखवला, तो वाखाणण्यासारखा होता. सायन व नायर हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागातील परिचारिकांना तातडीनं पीपीई किट देणं, दृष्टिहीन व्यक्तींना शिधा व गॅस सिलिंडर देणं, नाटकाच्या बॅकस्टेज कर्मचाऱ्यांना शिधा देणं, पीएम केअर्स फंडाला देणगी देणं,

नगरपालिकेच्या कोविड केंद्राला सुविधा उपलब्ध करून देणं – अशा अनेक गोष्टींसाठी सगळ्यांनी उत्साहानं निधी दिला. स्वतःच्या भविष्याची शाश्वती नसतानाही निःस्वार्थी वृत्तीनं मदत करणाऱ्या आपल्या क्लबच्या प्रत्येक व्यक्तीच्या 'Service Above Self' ला माझा नम्र प्रणाम!

'मार्तंड जे तापहीन, ते सदा सज्जन सोयरे होतु' – यापेक्षा मोठी गोष्ट कोणती असणार! हे पसायदान मला याच देही, याच डोळा मिळालं! यासाठी मी आपल्या क्लबचा कायम ऋणी राहीन.

(क्लब सचीव रो. कपिल पढेर यांच्या अथक सहकार्याशिवाय हे शिवधनुष्य पेलता आलं नसतं.)

# Rotary Inspires Learning





On 4th October, Rotary Club of Badlapur Industrial Area conducted a Science Quiz at Leeway School, Palegaon, engaging nearly 100 students from grades 8 to 10. The event aimed to spark curiosity in pure sciences and was enthusiastically appreciated by students, teachers, and the school leadership.

| Man Hrs | Rotarians Involved | Beneficiaries |
|---|---|---|
| 9 | 9 | 100 |

# Rangoli Workshop










On 5th October, Rotary Club of BIA organized a delightful Rangoli Training Workshop in collaboration with Sanskar Bharati. Thirteen participants took part under the guidance of four expert trainers from Sanskar Bharati.

| Man Hrs | Rotarians Involved | Beneficiaries |
|---|---|---|
| 15 | 5 | 40 |

# Basic Electronics Workshop






On behalf of seva sahyog Foundation, two workshops of basic electronics were conducted at siddhgad Vidyalay dongarnavhe near Murbad. 50 students participated. Basic concept of water level indicator, fire alarm, automatic day & night bulb, remote control, & television communication, burglar alarm etc. was demonstrated practically to all the students of 8 th & 9 th standard.

| Man Hrs | Rotarians Involved | Beneficiaries |
|---|---|---|
| 15 | 5 | 40 |

# SwarGandhar Symphony




Rotary Club of Badlapur Industrial Area welcomed Diwali with SwarGandhar — a mesmerizing musical celebration filled with soulful voices, heartfelt devotion, and vibrant cultural expression.



# SwarGandhar Symphony




| Man Hrs | Rotarians Involved | Beneficiaries |
|---|---|---|
| 45 | 45 | 60 |



# Vision for All




The Rotary Club of Badlapur Industrial Area successfully organized a Cataract Screening Camp on 28th October 2025 in collaboration with Bhakti Vedanta Hospital. A total of 35 beneficiaries were examined, out of which 6 patients were identified for cataract surgery and referred for further treatment.

| Man Hrs | Rotarians Involved | Beneficiaries |
|---|---|---|
| 30 | 8 | 35 |

# Weekly Meetings

## Week 1







## Week 2





# Happy BIRTHDAY






# Congratulations



**Siddhi Paraskar - Gold Medalist.**
**Secured 1st Rank in M.A.**

# Fort Making Activity

**By Rtn. Vaibhav Lawate**





# Rotary Netrutva Event








# Kandil Making Workshop

**By Rtn. Ujwala Chonkar**



# Baku Trip Memories



# Anns and Rotary Ladies Get Together



# माझी गावाकडची आजी

By Ann Akshada Padhye

रानामध्ये राबराब राबते माझी आजी
काळ्याकाळ्या मातीतून काढते ताजी भाज़ी!
नऊवारीचा पदर घेते डोक्यावरती ओढून
मातीसारखच कपाळ तिचं हिरवं झालंय गोंदून!

चुल फुंकून डोळ्यांच्या झाल्यात अगदी खाचा
भेगा पडूनपडून फुटल्यात पावलांच्या टाचा!
आजी म्हणते, 'जगण्याचा झालाय लै वांदा
बुंक्की मारून दणक्यात, फोडते अख्खा कांदा!'

ठेच्यासोबत चवीनं ती खाते भाज़ी भाकऱी!

आजी माझी रानामधल्या झोपडीमध्ये राहते
कणसावानी सुकली तरी हरणावानी चालते!
कधी मला भेटायला ती शहरामध्ये येते
गाठोडयातून जोंधळ्याचा हुरडा काढून देते!

कडाकडा बोट मोडून दृष्ट काढते माझी
बसमधून पुन्हा गावी एकटी जाते आजी!
अशी माझी गावाकडची तिखट गोड आजी
शहरामध्ये राहण्यासाठी होतच नाही राजी!

# भारतीय नारी क्रिकेटमे भारी

**By Rtn. Ashish Potnis**

कर्णधार हरमनप्रीतने दीप्ती शर्माच्या गोलंदाजीवर डी क्लर्कने टोलवलेला फटका झेलत केवळ चेंडूच नव्हे तर महिला क्रिकेट विश्वचषक देखील खिशात घातला आणि खचाखच भरलेल्या नवी मुंबईतील डीवाय पाटील स्टेडियम मध्ये मोठा जल्लोष झाला. विजयानंतर तुळशी विवाहासाठी राखून ठेवलेले फटाके फोडून भारतीय क्रिकेट प्रेमींनी विजयोत्सव साजरा केला. दोन नोव्हेंबरला भारतीय महिलांनी दक्षिण आफ्रिकन महिलांना ५२ धावांनी धूळ चारत प्रथमच विश्वचषकावर आपले नाव कोरले. जुन्याजाणत्या क्रिकेट रसिकांना हरमनचा झेल पाहिल्यावर १९८३ च्या विश्वचषक स्पर्धेतील अंतिम सामन्यातला कपिलने रिचर्ड्सचा घेतलेला झेल आठवत असेल. कपिलच्या त्या झेलामुळे तो अंतिम सामना आपल्याकडे झुकला होता तर हरमनच्या झेलामुळे आपण विश्वचषक जिंकला.

२९९ धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकन कर्णधार लॉरा वोल्वार्टची शतकी खेळी सुद्धा तोकडी पडली. खरं तर तिला दुसऱ्या बाजूने चांगली साथ मिळालीच नाही. अपवाद फक्त लूस आणि डर्कसनचा. याला कारणीभूत ठरणारे घटक म्हणजे हरमनची कप्तानी आणि मुख्य प्रशिक्षक अमोल मुजुमदारचे डावपेच. सध्या अवेळी पडणाऱ्या पावसामुळे भारताने फिरकी गोलंदाजाला प्राधान्य दिले आणि त्याच बळावर भारताने दक्षिण आफ्रिकेला खडे चारले. भारतीय फिरकी गोलंदाजांनी प्रतिस्पर्ध्याची दुसरी बाजू गारद केली. शेफाली वर्माने धोकादायक लुसला स्वतःच्या गोलंदाजीवर टिपत महत्त्वाची भागीदारी तोडली. त्यानंतर तिने तिच्या पुढच्याच षटकात अनुभवी मारीझान कापला बाद करून सामन्यावर पकड मजबूत केली.

त्यानंतर दीप्ती शर्मा ने दक्षिण आफ्रिकेचा निम्मा संघ तंबूत पाठवला. या दोघींनी फलंदाजीतही चमक दाखवत अर्धशतके झळकावली आणि भारताला ३०० च्या उंबरठ्यावर आणून ठेवले. नवोदित फिरकी गोलंदाज श्रीचारिणी, यष्टीरक्षक रिचा घोष आणि सलामीवीर स्मृती मंधाना यांचाही हातभार यात लागला होता. अप्रतिम सांघिक कामगिरी यापेक्षा उत्तम वर्णन ते काय!

भारताची भरवशाची सलामीवीर प्रतिका रावल जायबंदी झाल्यामुळे शेफाली वर्माला उपांत्य आणि अंतिम सामन्यात संधी मिळाली आणि तिने या संधीचे सोने केले. दोन षटकार आणि सात चौकारांसह ७८ चेंडूत झंझावाती ८७ धावा करताना झाशीच्या राणीने कवायती सैन्याचा जसा पाडाव केला त्याचप्रमाणे शेफालीने आफ्रिकन गोलंदाजांना चिरडून टाकले. शतकी सलामीनंतर फॉर्मात असलेली स्मृती मंधांना बाद झाली तेव्हा संपूर्ण स्टेडियममध्ये स्मशानशांतता पसरली होती. डावाच्या शेवटी यष्टीरक्षक रिचा घोषचा झंझावात आणि दिप्ती शर्माच्या चेंडूगणिक धावांमुळे भारताने दक्षिण आफ्रिकेसमोर भक्कम आव्हान उभे केले होते जे अंतिमतः दक्षिण आफ्रिकेसाठी पूर्णपणे अशक्यप्राय ठरलं.

भारतीय संघाचे मनोधैर्य वाढलं ते उपांत्य फेरीतील विजयामुळे. उपांत्य फेरीत गाठ होती ती सात वेळा विश्वचषक जिंकणाऱ्या बलाढ्य ऑस्ट्रेलियाशी. प्रथम फलंदाजी करताना कांगारूंनी ३३८ धावा कुटल्या आणि रसिकांना भारताच्या विजयरथाचे चाक उपांत्य फेरीतच अडकणार असेच वाटू लागले. पण भारतीय संघ विजयी होऊ शकतो हा मंत्र दिला तो मुख्य प्रशिक्षक अमोल मुजुमदारने. पीच आणि आऊटफील्डचा व्यवस्थित अभ्यास असणाऱ्या अमोलने उत्तरोत्तर गोलंदाजी करणे हे ऑस्ट्रेलियाला जड जाईल आणि तेच आपल्या पथ्यावर पडेल ही जाणीव त्याने करून दिली.

पहिल्या दहा षटकात दोन्ही सलामीवीर माघारी परतल्यावर कर्णधार हरमनप्रीत आणि मुंबईकर जेमिमा रॉड्रिग्ज यांनी दीड शतकी भागीदारी करत विजय दृष्टीक्षेपात आणला. आता उर्वरित पंधरा षटकात ११३ धावांची गरज होती आणि शतकवीर जेमीने दिप्ती शर्मा, रिचा घोष आणि अमनदीप कौर यांच्या साथीने उपयुक्त भागिदाऱ्या करत भारतीय नौका पैलतीरी नेली.

या विश्वचषकात सर्वाधिक २२ बळी तसेच २१५ धावा करणाऱ्या दीप्ती शर्माला 'मालिकावीर' म्हणून गौरवण्यात आले. स्मृती मंधाना, प्रतिका रावल यांच्यासोबत जेमिमा रॉड्रिग्ज, हरमनप्रीत कौर, रिचा घोष यांनी फलंदाजीचा डोलारा सांभाळला. श्रीचारिणी आणि क्रांती गौड यांनी गोलंदाजीत दिप्ती शर्माला चांगली साथ दिली. या विश्वविजयानंतर काही बाबी अमोल आणि संघ व्यवस्थापनाने विचारात घ्यायला हव्यात. साखळी सामन्यांत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध आवाक्यात असलेला सामना आपण हरलो. ३५ षटकात ६ बाद १४२ अशा बिकट स्थितीनंतर नाडील डि क्लर्कने झंझावाती खेळी करत २५२ धावांचे आव्हान लीलया पार पाडलं. हीच गोष्ट इंग्लंड विरुद्ध झाली. इंग्लंडच्या २५९ धावांचा पाठलाग करताना आपल्याला चार धावा कमी पडल्या. ऑस्ट्रेलियाविरुद्ध ३३० धावांचं आव्हान उभं करूनही भारताला पराभवाची चव चाखावी लागली. या बाबी नक्कीच चिंताजनक आहेत. क्षेत्ररक्षणात रेणुका सिंग चौधरीला कुठे लपवायचं याची चिंता हरमनला सतत असे. त्यात सर्वोत्तम क्षेत्ररक्षक जेमीने अंतिम फेरीत खतरनाक डी क्लर्कचा हातातला झेल सोडला या बाबी देखील नजरेआड करता येणार नाहीत.

या विश्वविजयामुळे भारतीय मुलींना स्फूर्ती मिळेल आणि भारतीय महिला क्रिकेट भरभराटीस येईल असा विश्वास वाटतो.

हरमनप्रीत आणि भारतीय महिला क्रिकेट संघाचे मनःपूर्वक अभिनंदन. त्याचबरोबर मुख्य प्रशिक्षक अमोल मुजुमदारचेही विशेष कौतुक. भारतीय महिला खेळाडूंचा जागतिक स्तरावरील उमटणारा ठसा हा खरोखरीच प्रेरणादायी आहे. पुढील वाटचालीसाठी भारतीय महिला क्रिकेट संघाला शुभेच्छा.

© आशिष पोतनीस

# आठवणींची साठवण!

**By Ann Unnati Wakhare**

*नेमेची येतो मग पावसाळा...* या उक्तीप्रमाणे दसरा झाला की दिवाळीची चाहूल लागते. दिवाळी म्हणजे उत्साह, आनंद, नवीन कपडे, फराळाचे पदार्थ,रांगोळ्यांची आरास, आकाशकंदील, नातेवाईकांच्या गाठीभेटी आणि बरंच काही. पण या वर्षीची आमची दिवाळी जरा वेगळी होती कारण आम्ही लेकीला भेटायला परदेशी जाणार होतो. 2 वर्षांनी लेक भेटणार होती त्यामुळे वेगळाच उत्साह होता. जर्मनीचा व्हिसा न मिळता स्विस व्हिसा मिळाल्यामुळे माझी पहिलीच परदेशवारी स्वितझरलंडची होणार होती. मुलगी सुद्धा स्वितझरलंडला आली. तिघे मिळून 3 दिवस तिथे फिरलो. हॉटेलमधे चेक इनला काही तास असल्यामुळे आपल्याकडील लगेज साठी झुरिक रेल्वेस्टेशन वर असलेली लॉकरची व्यवस्था खूपच सुखावह होती. Lucern ला बस, ट्राममधून, तसेच 2500मी. उंचीवर पिलाटस ला जाताना बोट, जगातील सर्वात स्टीपेस्ट ट्रेन म्हणजे जास्त चढ असलेल्या ट्रेनमधून व खाली येताना रोपवे ने प्रवास केला. सगळेच नवीन, अद्भुत होते. सुंदर निसर्ग, स्वच्छता, लँडस्केप मधे दिसतात तशी झाडे, मोठमोठे रस्ते, भुयारात जाणारे सरकते जिने, भुयारातील अनेक मोठमोठी दुकाने, अतिशय शिस्तीत चालणारी ट्रॅफिक व्यवस्था, झेब्रा क्रॉसिंग वर वाट बघून रस्ता क्रॉस करणारी सगळी मंडळी, प्रत्येकाला असलेली कमीतकमी 2 मुले व जवळ एखादा कुत्रा, अगदी 80-85 वयाची माणसे सुद्धा किती छान एकटयाने प्रवास करतात हे पाहून मन थक्क व्हायला होते. झुरिक, मानेग, लुसर्न, पिलाटस असा प्रवास करून ट्रेनने जर्मनीतील म्युनिकला पोहोचलो. सम्पूर्ण प्रवासात सिनेमात असतो तसा निसर्ग सोबत करत होता. आजुबाजूचे पिवळ्याजर्द पानांचे मेपल वृक्ष आपल्याकडील बहाव्याच्या झाडांची आठवण करून देत होते.

म्युनिकच्या मुक्कामात अनेक प्रेक्षणीय, ऐतिहासिक स्थळे पाहिली. ऐन दिवाळीत मुलगी वैभवीचे मित्रमैत्रिणी घरी आले होते. त्यातच विलास व वैभवीचे वाढदिवस, विलासजींचे जर्मन एक्स बॉस व त्यांची पत्नी यांचे 2 दिवसांसाठी झालेले आगमन यात दिवस भराभर निघून गेले. आता बाकूच्या ट्रिपचे वेध लागले होते. त्यासाठी व्हिएन्ना वरून विमान पकडायचे होते. 2 दिवस व्हिएन्नाला फिरायचे ठरले. तिथे Airbnb चा छान अनुभव आला. मोठमोठे चर्च, 17व्या शतकातील राजांचे राजवाडे, त्यासमोरील बागा, म्युझिअम्स म्हणजे स्थापत्यकलेचे उत्कृष्ट नमुने आहेत. तेथील लोकांनी ते व्यवस्थित जतनही केले आहेत. आपला देशही सुंदर आहेच! पण वैभवीला भेटण्याच्या निमित्ताने परदेशी जाणे झाले. तिथले वातावरण, संस्कृती अनुभवायला मिळाली. त्यातूनही नवीन उर्जा मिळाली. आम्हाला व्हिएन्ना विमानतळावर पोहोचवून वैभवी म्युनिकला जाणार होती. जगाच्या पाठीवर आपली मुलगी कुठे, कशी राहते हे 'याचि देही, याचि डोळा' पाहून आम्ही निघालो होतो. आयुष्याच्या एका टप्प्यावर आपली मुलेच आपली मार्गदर्शक बनतात याचा सुखद अनुभव आम्ही घेतला. निघण्यापूर्वी एका मैत्रिणीने शुभेच्छा दिल्या होत्या - लेकीकडे जाऊ.... तूपरोटी खाऊ... छान हिंडू फिरू... एकत्र राहू... मगच परत येऊ ...या शुभेच्छा आम्ही अक्षरशः जगलो होतो. भरल्या डोळ्यांनी आम्ही वैभवीचा निरोप घेतला आणि बाकुला निघालो. रोटेरियन प्रसादने तिथे सर्वांची उत्तम व्यवस्था केली होती. 3-4 दिवस फिरून झाल्यावर आता घरची ओढ लागली होती. एवढे फिरवून घरी सुखरूप आणल्याबद्दलu देवाचे आभार मानले. आता मनात असंख्य आठवणी आहेत. कधीतरी मनाचा कप्पा उघडायचा आणि आत डोकवायचं... इतकंच...!

- उन्नती वखारे.
5.11.2025

# Airbnb चा धम्माल अनुभव

**By Rtn Vilas Wakhare**

काही दिवसांसाठी आम्ही मुलीकडे जर्मनीमधील म्युनिक सिटी मध्ये गेलो होतो.

तिथून अजरबैजान मधील बाकू शहरांत पर्यटनास आम्हास जायचे असल्याने आणि म्युनिक च्या ऐवजी व्हिएना वरून बाकू ला डायरेक्ट फ्लाईट असल्याने आम्ही दोन दिवस व्हिएना मधे घालवून मग बाकुसाठी फ्लाईट पकडावी असे ठरवले.

आता व्हिएन्नात हॉटेल खूपच महाग असल्याचे लक्षात येताच मुलीने *Airbnb* ने दोन दिवस राहण्यासाठी बुकिंग केले. Airbnb चा फुल फॉर्म *air bed and breakfast.*

जसं ola किंवा uber हे प्लॅटफॉर्म आपल्याला ट्रॅव्हल बुकिंग साठी उपलब्ध असतात तसंच काहीसं तात्पुरता राहण्यासाठी air bnb च आहे. इतर देशांसाखा आपल्या देशातही हा प्लॅटफॉर्म उपलब्ध आहे आणि तात्पुरता राहण्यासाठी अपार्टमेंट ची सोय हॉटेल पेक्षाही स्वस्तात होत असल्याने बरेच जण आजकाल ह्याचा वापर करतात.

हॉटेल महाग असल्याने मुलीने व्हिएना शहरांत दोन दिवसांसाठी आम्हाला तिघांसाठी बुकिंग केले. बुकिंग केल्यानंतर तिच्या लक्षात आले कि ज्या साईट वरून तिने बुकिंग केले आहे तिचे रीव्हू म्हणावे तितके चांगले नाहीयेत. रूमच्या स्वच्छतेविषयी आणि इतर सोयीविषयी तिला काळजी वाटत होती. मी तिला म्हटलं कि काही काळजी करू नकोस तिथे गेल्यावर रूम बरोबर नसेल तर आपण त्यांच्याशी वेळ पडल्यास भांडून नवीन चांगली रूम बघू घेऊ. पण तरीही तिचे टेन्शन काही जात नव्हते. ती टेन्शन मधे का होती ते मला तिथे प्रत्यक्ष गेल्यावर कळाले 😄

आम्ही ठरल्याप्रमाणे त्यांच्या चेक इन च्या वेळी म्हणजे दुपारी तीन वाजता त्या अपार्टमेंट पाशी पोचलो. अपार्टमेंट ला एंट्रन्सलाच एक भलमोठा लाकडी दरवाजा होता. तो लॉक होता. दरवाज्या पाशी एक डिजिटल डिस्पले होता.
तिथूनच खरी गंम्मत सुरु झाली.😜
मुलीने आदल्या दिवशी बुकिंग करून रूम चे दोन दिवसांचे सर्व पैसे ऍडव्हान्स भरल्यावर तिला त्यांच्या कडून एक भला मोठा मेसेज आला होता. त्या मेसेज मधे सुरवातीला एक नंबर होता. तो नंबर तो लाकडी दरवाजा उघडण्यासाठी होता.
मुलीने नंबर त्या डिजिटल डिस्पले वर टाकल्यावर क्लीक आवाज झाला आणि आम्ही दरवाजा उघडून आतमध्ये गेलो. आतमध्ये पॅसेज मधे सन्नाटा. कोणीच नव्हतं. वर जायला फक्त एक जिना होता. पायऱ्या चढून वर गेल्यावर समोर एक छोटा दरवाजा होता. त्याला एक चार डिजिट चं कॉम्बिनेशन लॉक होतं.
मुलीने परत मेसेज बघून त्या कुलूपाचे नंबर सेट केले आणि ते कुलूप उघडलं. तो छोटा दरवाजा उघडल्यावर आत मधे भरपूर छोटे छोटे कप्पे होते. प्रत्येक कप्प्याच्या खाली एक नंबर लिहिलेला होता. तो रूम नंबर होता. प्रत्येक कप्प्याला एक चार डिजिट कॉम्बिनेशन लॉक होतं.
मुलीने परत मेसेज बघून पाच नंबर कप्प्याचं कॉम्बिनेशन नंबर लॉक ओपन केल्यावर त्या छोट्या कप्प्यातून एक चावी बाहेर काढली. ती चावी घेऊन आम्ही पुन्हा तो कप्पा आणि दरवाजा लावून घेऊन जिना उतरून खाली आलो. खाली पाच नंबर च्या रूम च्या लॉक ला ही चावी लावून दरवाजा उघडला. ह्या सर्व खटाटोपीत आम्हाला एकही माणूस अथवा बाई दिसली नाही.

Rotary Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TiTEN

आम्ही रूम मधे गेल्यावर सर्वात प्रथम मुलीने सर्व गोष्टी जागच्या जागी दिसल्यावर सुटकेचा निश्वास सोडला आणि तेव्हा माझ्या लक्षात आले कि ती एवढी टेन्शन मधे का होती.
रिसेपशनिस्ट किंवा केअर टेकर नावाचा प्रकारच नव्हता. जर तुम्हाला रूम योग्य वाटली नाही तर सांगणार कोणाला? भांडणार कोणाशी?
तक्रार फक्त फोन करूनच करायला लागणार आणि ते पण त्यांनी फोन उचलला तरच, नाही तर राहायची दुसरीकडे व्यवस्था केल्याशिवाय पर्याय नाही.
बरं ह्या रूम साठी घालवलेले पैसे परत मिळतील, पण ते केव्हा ह्याची ग्यारंटी नाही 🤦🏻‍♂️
आमच्या नशिबानेआमची रूम खूपच चांगली निघाली. त्या रूम मधे छोटं डायनिंग टेबल होतं, खुर्च्या होत्या,हॉटेल सारखी टॉयलेट ची व्यवस्था होती, तीन चार डिश , चाकू, पाणी गरम करायची किटली, चमचे, चक्क थोडी साखर, मीठ, छोटी भांडी, मायक्रोवेव्ह ओव्हन, छोटा फ्रिज, दोन इलेक्ट्रिक शेगड्या इत्यादी सर्व काही जागच्या जागी होते. एखाद्याला जिन्नस असतील तर खाण्यासाठी पदार्थ बनवण्याची जवळपास सर्व व्यवस्था होती.
दुसऱ्या रूम मधे एक डबल बेड होता बाजूला एक सिंगल बेड ही होता. विशेष म्हणजे दोन्ही स्वच्छ होते.अलमारी पण होती कपडे ठेवण्यासाठी.
हे सर्व बघून आणि मुलीच्या चेहऱ्या वरचा आनंद बघून आम्हाला दोघांना बरे वाटले. बाई माणूस विरहित रूम्स कश्या भाड्याने मिळतात हे airbnb मुळे कळाले. हा सगळा प्रकार अलिबाबाच्या खुलं जा सिम सिम सारखाच वाटला. 😄

घाईगडबडीत अपार्टमेंट चा मेन दरवाज्याचा फोटो काढायचा राहून गेला पण बाकी बहुतांशी सर्व फोटो काढले आहेत.

एन्जॉय.

विलास वखारे
बदलापूर.









# ज्ञान-संवर्धन मोहिम

**By Rtn Rajiv Diwan**

गेल्या वर्षी म्हणजे सन २०२४-२५ च्या दिपावली सुट्टीच्या आसपास माझे रोटेरियन स्नेही श्री. विलासजी वखारे यांच्या माध्यमातून सेवा सहयोग फाउंडेशन शी जोडला गेलो. मीरा - भाईंदर येथील केशव सृष्टी येथे गेल्या वर्षी समाजा तील वंचित* विद्यार्थी - विद्यार्थीनींसाठी शिबिर आयोजित केले होते.
(*वंचित याचा अर्थ - आर्थिक पाठबळ नसल्याने व्यक्तीमत्व विकासासाठी जरुर असणा-या योग्य मार्गदर्शनापासून वंचित...!!!)
ह्या वर्षी म्हणजे सन २०२५-२६ वर्षांमधील शिबिर वाडा येथील गोवर्धन कौशल्य विकास केंद्र येथे आयोजित केले होते. कर्जत,बदलापूर,अंबरनाथ,बोरिवली,ठाणे गोरेगाव,या व अशा भागातील "वंचित" मुला- मुलींचा सहभाग होता.
दि.३०,३१ आक्टोबर व १ नोव्हेंबर २५ अशा तीन दिवस निवासी शिबिरा मधे वर नमूद केलेल्या भागातील ७५० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. ह्या सर्व विद्यार्थी - विद्यार्थ्यीनांच्या प्रवास,निवासी सोयी,जेवण वगैरे च्या खर्चाचा भार संस्था उचलते.
दि.३१ आक्टोबर २५ रोजी मला ह्या शिबिरामधे "समुत्कर्ष अभ्यासिका प्रकल्प” आयोजित जिज्ञासा शिबिरामध्ये "संज्ञानात्मक खेळाच्या माध्यमातून व्यक्तीमत्व विकास" ह्या विषयावर मार्गदर्शन व खेळ घेण्यासाठी बोलावले होते. साधारणपणे २ तासांच्या खेळातील सहभागामुळे सर्व विद्यार्थ्यांनी खूप आनंद घेतला. भरपूर शारिरीक कसरती, व्यायामामुळे मुलांना कडकडून भूक लागल्यावर खेळ थांबवला. जेवण झाल्यावर मुलांनी "सर, , जाम दमवलंत पण, खेळताना खूप मज्जा आली" हे ऐकून मी तिथे जाण्याचा कार्यभाग सिध्द झाला ह्याचे समाधान वाटले.

सेवा सहयोग फाउंडेशन ची, २०१३ च्या कलम ८ अंतर्गत औपचारिक नोंदणी झाली.( ह्याची वाचकांनी दखल घ्यावी). शहरी झोपडपट्ट्यां मधील लोकांचे जीवन सुधारणे आणि त्यांना सक्षम करणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे.
सामुदायिक शिक्षण केंद्र (Community Learning Centers); (CLC): शाळेत जाणाऱ्या मुलांना सामुदायिक शिक्षण केंद्रांमध्ये दिले जाते. संजय हेगडे कौशल्य विकास केंद्रांसारख्या प्रकल्पांतर्गत लोकांना कौशल्ये शिकवली जातात. वंचित समुदायांच्या विकासासाठी काम करणाऱ्या इतर सामाजिक संस्थां सोबतही ही संस्था सहकार्य करते.
वयात येणाऱ्या मुलींसाठी ऋतूस्त्रावाबद्दल माहिती, त्याकाळात घेण्याची काळजी, स्वच्छता, होणारे शारीरिक बदल वगैरे संबंधित माहिती देणे तसेच सॅनिटरी नॅपकीनचा वापर आणि त्याची योग्य विल्हेवाट याची ही माहिती दिली जाते.
मुली व मुले यांच्या शारिरीक विकसना प्रमाणे, मानसिकता प्रगल्भता याचे प्रामुख्याने शिक्षण दिले जाते. सेवा सहयोग ही एक स्वयंसेवक-आधारित संस्था आहे, जी समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी स्वयंसेवकांच्या मदतीने कार्य करते. संस्थेला Corporate Social Responsibility, Individual Social Responsibility वगैरे सारख्या माध्यमातून आर्थिक पाठबळ मिळत असते. मला मिळालेले शिक्षण, आई- वडिल, गुरुजन यांनी केलेले संस्कार, व्यावसायिक क्षेत्रातील अनुभव ह्याच्या पाठबळावर समाजातील गरजू विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होत असताना पाहून अशा शिबिरातील सहभागामुळे जे मानसिक समाधान मिळते ते शब्दातीत आहे.

आर्थिक स्वरूपातील मानधनापेक्षा शिबिरातील एका स्वयंसेवक विद्यार्थीनीने तयार केलेली कलाकृती भेट स्वरूपात मला दिली याचा खूप आनंद झाला.









Thank you